## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २० ऑगस्ट: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) डिस्टन्स एज्युकेशन ब्युरो (DEB), नवी दिल्ली यांच्याकडून **'दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र' ('सेंटर फॉर डिस्टन्स अँड ऑनलाईन एज्युकेशन' - CDOE)** या नावाने नवीन केंद्र सुरू करण्यास अधिकृत मान्यता मिळाली आहे. विद्यापीठाचे विद्यमान मा.कुलगुरू महोदय, प्रा.व्ही. एल. माहेश्वरी, मा.प्र-कुलगुरू महोदय, प्रा.एस. टी. इंगळे, मा. कुलसचिव, डॉ. विनोद पाटील, मा. वित्त व लेखाधिकारी, सिए. रवींद्र पाटील, मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रा. योगेश पाटील, विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाचे सर्व सन्माननीय सदस्य, मा.संचालक, आजीवन विभाग, प्रा.मनिष जोशी, मा.संचालक,दूरस्थ केंद्र, प्रा. समीर नारखेडे यांच्या अथक प्रयत्नाने आणि प्रभावी मार्गदर्शनाने समाजातील तळागाळातील प्रत्येक घटकाला दूरशिक्षणाद्वारे उच्च शिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

या केंद्रांतर्गत चालू शैक्षणिक वर्षापासून **एम.ए. इतिहास (M.A. History)** आणि **एम.ए. संरक्षण व सामरिकशास्त्र (M.A. Defence and Strategic Studies)** हे दोन पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम सुरू करण्यास परवानगी मिळाली असून, याची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया **२० ऑगस्ट** २०२६ पासून सुरू होत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सत्र पद्धतीने शिक्षणक्रम संरचना आहे. Multiple entry and multiple exit, Academic Bank Credit हि सुविधा आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करण्यासाठी रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन सत्रे आयोजित केली जातात. यूजीसीच्या (UGC) नियमांनुसार तयार केलेले अद्ययावत अभ्यास साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाते. नियमित महाविद्यालयाच्या पदवीशी समकक्ष पदवी असल्याने नेट/सेट/पीएच.डी. करण्यास तसेच नोकरी आणि बढतीच्या समान संधी मिळतात. जळगाव,धुळे आणि नंदुरबार या तीनही जिल्ह्यात परीक्षा केंद्रांची सुविधा उपलब्ध आहे.

उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी दूरशिक्षण हा आजच्या काळात एक अत्यंत प्रभावी, सोयीस्कर आणि क्रांतिकारी पर्याय ठरत आहे. विद्यार्थी नोकरी, व्यवसाय किंवा घरकाम सांभाळून रात्री, सुट्टीच्या दिवशी किंवा त्यांच्या मोकळया वेळेत अभ्यास करू शकतात. बदलत्या काळात प्रत्येकालाच नियमित महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेणे शक्य होत नाही. अशा वेळी दूरशिक्षण (Distance Education) हा एक उत्तम पर्याय ठरतो. नोकरी, कौटुंबिक जबाबदाऱ्या किंवा स्वतःचा व्यवसाय सांभाळून विद्यार्थी आपल्या वेळेनुसार अभ्यास करू शकतात. कोणत्याही वयातील व्यक्तीला आपले अर्धवट राहिलेले शिक्षण पुन्हा सुरू करण्याची सुवर्णसंधी यामुळे मिळते.

आर्थिक परिस्थितीमुळे अनेक तरुणांना वयाच्या एका टप्प्यावर नोकरी किंवा व्यवसाय सुरू करावा लागतो. अशा वेळी शिक्षण सोडून देण्याची वेळ येत नाही.तरुण आपली नोकरी सांभाळून पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करू शकतात. यामुळे त्यांचा कामाचा अनुभवही वाढतो आणि सोबतच शैक्षणिक पात्रताही वाढते. कौटुंबिक किंवा वैयक्तिक कारणांमुळे ज्यांचे शिक्षण मध्येच सुटले आहे, अशा व्यक्ती ५ ते १० वर्षांच्या गॅपनंतरही पुन्हा शिक्षण सुरू करू शकतात. गृहिणी किंवा वयस्कर व्यक्तीही आपल्या आवडीच्या विषयात पदवी मिळवू शकतात. अनेक कंपन्यांमध्ये किंवा सरकारी क्षेत्रांमध्ये बढती (Promotion) किंवा पगारवाढ मिळवण्यासाठी उच्च पदवी असणे आवश्यक असते.

दूरशिक्षणामुळे 'शिक्षण' हे केवळ विशिष्ट वयापुरते किंवा कॉलेजमध्ये जाणाऱ्यांपुरते मर्यादित राहिले नसून, ते "सर्वांसाठी शिक्षण" (Education for All) या संकल्पनेला खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आणत आहे. या केंद्राची प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने राबवली जाणार आहे. प्रवेशासाठी पात्रता, फी आणि इतर सविस्तर तपशील विद्यापीठाच्या या अधिकृत संकेतस्थळावर https://nmu.ac.in/Distance-Education या लिंक अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी 0257-2257495/2258496 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

"विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन गृहिणी, नोकरदार वर्ग आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण करावे आणि करिअरला नवी दिशा द्यावी," असे आवाहन दूरशिक्षण केंद्राचे संचालक, प्रा. समीर नारखेडे यांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २० ऑगस्ट: विद्यापीठात जीवनाची सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरण, अभ्यासक्रम, प्रयोगशाळा, संशोधनाच्या संधी आणि भविष्यातील करिअरच्या विविध वाटांची ओळख व्हावी, या उद्देशाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळा वतीने बी.एस्सी. व एम.एस्सी. च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १८ व १९ ऑगस्ट २०२६ रोजी दोन दिवसीय 'इंडक्शन प्रोग्राम' चे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी प्रशाळाचे संचालक प्रा. संजय अत्तरदे यांनी नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विभागप्रमुख प्रा. व्ही. एम. रोकडे यांनी विद्यार्थ्यांना विद्यापीठ, प्रशाळा सविस्तर ओळख करून दिली. प्रशाळाची विभागीय कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध शैक्षणिक वातावरण याबाबत त्यांनी माहिती दिली. यानंतर प्रा. एस. आर. थोरात यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची रचना, विषयांचे स्वरूप, प्रात्यक्षिके आणि शैक्षणिक प्रगतीचे महत्त्व समजावून सांगितले. दुपारच्या सत्रात डॉ. नवीन खंडारे यांनी

विद्यार्थ्यांना KCIIL संदर्भात माहिती दिली. विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये कार्यरत असलेले KCIIL हे नवकल्पना, उद्योजकता आणि उद्योग अकादमी सहकार्याला चालना देणारे एक केंद्र आहे असे सांगितले. इंडक्शन प्रोग्रामच्या दुसऱ्या दिवशी डॉ. प्रदीप जाधव यांनी भूशास्त्रातील करिअरच्या विविध संधी व मार्ग या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. के. पी. दांडगे यांनी विद्यार्थ्यांना विद्यापीठातील कॅम्पस सुविधा व विद्यार्थी सहाय्य सेवांबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील उपलब्ध सुविधा, शैक्षणिक संसाधने आणि विविध विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांचा प्रभावी वापर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. भावेश पाटील यांनी जिऑलॉजी संग्रहालयमध्ये (Museum) उपलब्ध असलेल्या प्रत्यक्ष खडक, खनिजे आणि जीवाश्मांच्या नमुन्यांच्या माध्यमातून पृथ्वीची रचना, भूगर्भीय प्रक्रिया माहिती दिली. गौरव पाटील आणि समाधान महाजन यांनी पर्यावरण प्रयोगशाळेतील संसाधने व कार्यपद्धतीची माहिती दिली. डॉ. वाय. जे. महाजन यांनी जिओग्राफी प्रयोगशाळेतील विविध शैक्षणिक साधने व प्रात्यक्षिकांचे महत्त्व स्पष्ट केले. दुपारच्या सत्रात प्रा.  डी.जी. हुंडीवाले यांनी IPR (Intellectual Property Rights) या विषयाची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. संशोधन, नवकल्पना, नवीन संकल्पना आणि बौद्धिक निर्मितीचे संरक्षण करण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. दोन दिवसीय इंडक्शन प्रोग्रामच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. के. पी. दांडगे आणि डॉ. भावेश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. नवीन विद्यार्थ्यांना विद्यापीठाशी जोडणे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि शिक्षणासोबत संशोधन व कौशल्य विकासाची दिशा देणे' हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश यशस्वीपणे साध्य झाला.

**बातमी नं.३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २० ऑगस्ट: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग हा विद्यापीठ आणि समाज यातील दुवा म्हणून कार्य करीत असून या विभागाच्या माध्यमातुन विद्यापीठ परीक्षेत्रातील विविध महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने परीसरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य व कायदा, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातील युवक-युवतींसाठी व्यक्तिमत्व विकास, संवाद कौशल्य, उद्योजकता व रोजगार, लिंगभाव व संवेदनशीलता अशा विविध विषयांवरील प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा यांचे आयोजन विभागाच्या वतीने वेळोवेळी केले जाते.

याच अनुषगाने विद्यापीठाचे मा. कुलगुरु महोदयांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून शेतकरी सहायता उपक्रम याचा प्रारंभ विभागाने केला आहे. खान्देश ही शेतकऱ्यांची भूमी आहे. खान्देशातील जळगाव, धुळे व नंदुरबार या प्रदेशातील बहुतांश जनजीवन हे शेतीशी निगडित आहे. केळी व कापूस यांच्या उत्पन्नासाठी सुप्रसिध्द अशा या आपल्या भूभागातील सण-उत्सव, यात्रा-जत्रा असे सगळे सांस्कृतिक जीवन शेतीमातीशीच जोडलेले आहे. अशा कृषीसंस्कृतीनिष्ठ प्रदेशातील युवा पिढीच्या उज्वल भवितव्यासाठी विद्यापीठ कटिबंध आहे. या युवा पिढीला उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कष्ट उपसणाऱ्या त्यांच्या शेतकरी आईवडिलांच्या जीवनविकसनासाठीही विद्यापीठ काही पावले टाकू इच्छिते. त्यासाठी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या माध्यमातून शेतकरी सहायता उपक्रम आयोजनासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. शेतकरी सहायता उपक्रम या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञान साक्षरता कार्यशाळा (शेतीशी संबंधित आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग शेतकरी चांगल्या प्रकारे करु शकतील यासाठी प्रशिक्षण), शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन कार्यशाळा, शेतीशी निगडीत व शेतीपूरक उद्योग व्यवसायांबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रम (स्टार्टअपसाठी सहाय्य), शेतकऱ्यांसाठी पारंपारिक ज्ञानाचे जतन व हस्तांतरण संवर्धन कार्यशाळा, सेंद्रिय शेती, शेतकरी कुटुंबांसाठी समुपदेशन कार्यशाळा अशा विविध उपक्रमांच्या धर्तीवर कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ परिक्षेत्रातील शासन मान्यताप्राप्त शेतकी संघ, वि.का. सोसायटी व शेतकरी बांधवासाठी कार्य करणाऱ्या संस्था यांना करता येईल.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व शासन मान्यताप्राप्त शेतकी संघ, वि.का. सोसायटी व शेतकरी बांधवासाठी कार्य करणाऱ्या संस्था आवाहन करण्यात येते की. शेतकरी सहायता उपक्रम आयोजित करावयाचा असल्यास नियम, अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्यांनी तसा प्रस्ताव विभागाकडे पाठवावा प्रस्ताव पाठविण्याचा अर्जाचा नमुना विद्यापीठाचा nmu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. विहीत नमुन्यात दिलेल्या ई. पत्यावर सादर करावा. प्रस्ताव विभागाचा ई पत्ता directorilleb@nmu.ac.in वर पाठवावा. अधिक माहितीसाठी ०२५७-२२५७४१५/४१६ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन विभागाचे संचालक प्रा.डॉ.मनिष जोशी यांनी केले आहे.

..............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २० ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,जळगाव

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता